सदैव मदतीला धावून येतात म्हणून तेली समाज बांधव आमदार संजय रायमुलकर यांच्याच पाठीशी : ॲड. गजानन क्षीरसागर >>पान 2

स्वत:च्या हत्येचा बनाव करून मित्राची हत्या करणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी केले जेरबंद >>पान 3

सर्व मिळून महाविकास आघाडीच्या उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करू >>पान 4

**सुविचार**

लक्षात ठेवा अपेक्षा हेच दुःखाचं मूळ कारण आहे.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



दुसऱ्या दिवशीही बाजीरावचा दबदबा, कमावले इतके कोटी

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 87 ■ मंगळवार, दि. 05 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# राज्यातील २८८ मतदारसंघातून ४ हजार १४० उमेदवार रिंगणात

## छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक; शहादा मतदारसंघात केवळ तीनच उमेदवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी** :राज्यातील विधानसभा निवडणुकीतील लढतींचे चित्र अखेर स्पष्ट झाले असून, २८८ मतदारसंघात ४ हजार १४० उमेदवार रिंगणात उतरले आहेत.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील २८८ मतदारसंघात दाखल केलेल्या एकूण उमेदवारी अर्जांपैकी ७ हजार ७८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. सोमवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत २ हजार ९३८



उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळे अंतिमतः राज्यात एकूण ४ हजार १४० उमेदवार निवडणूक रिंगणात उरले आहेत.

जळगाव शहर आणि छत्रपती संभाजीनगर पूर्व विधानसभा मतदारसंघातून सर्वाधिक २९, तर नंदूरबारच्या शहादा मतदारसंघात केवळ ३ उमेदवार रिंगणात आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या कोपरी पाचपाखाडी मतदारसंघात ९, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दक्षिण पश्र्चिम मतदारसंघात १२, तर अजित पवारांच्या बारामतीत २३ उमेदवार नशीब आजमावत आहेत. मुंबईचा विचार करता, जोगेश्र्वरी पूर्व २२ आणि मानखुर्द शिवाजीनगरमधून सर्वाधिक २२; तर विलेपार्ले, चेंबूर आणि माहिम मतदारसंघात सर्वात कमी ६ उमेदवार मैदानात उतरले आहेत.

### मुंबई उपनगर जिल्ह्यातील २६ विधानसभा मतदारसंघात ३१५ अंतिम उमेदवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी:** मुंबई उपनगर जिल्ह्यातील २६ विधानसभा मतदारसंघांमध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ साठी आज उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर अंतिम ३१५ उमेदवार आहेत, अशी माहिती मुंबई उपनगर जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उमेदवारी अर्ज मागे घ्यायच्या अखेरच्या दिवशी ५३ जणांनी माघार घेतली. मुंबई उपनगर जिल्ह्यातील २६ विधानसभा मतदारसंघांमध्ये दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे.

### गुरुवारी नांदेड उत्तर मतदारसंघातील उमेदवारांची प्रथम तपासणी

दैनिक आपला विदर्भ



**नांदेड/प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या अनुषंगाने ८६ नांदेड उत्तर मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी गुरुवार ७ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ या कालावधीत कै. डॉ. शंकरराव चव्हाण, नियोजन भवन, कॅबिनेट हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, परिसर नांदेड येथे खर्च निरीक्षकासमोर आयोजित केली आहे. या तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम , १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार एकतर तो स्वत: किंवा त्याच्या, तीच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे त्याला, तीला नामनिर्देशित करण्यात आले आहे. त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागण्याच्या दिनांकापर्यंत दोन्ही दिनांक धरुन, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे असे ८६ नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी ललितकुमार वऱ्हाडे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## राज्यात ९.७ कोटी मतदार; पुण्यात सर्वाधिक; पाच जिल्ह्यांमध्ये महिला मतदारांची संख्या अधिक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीसाठी २८८ मतदारसंघातील सुमारे ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारसंख्येत पुणे जिल्हा आघाडीवर आहे. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत अधिक आहे.



पुण्यात ८८ लाखांहून अधिक मतदार

पुण्यातील एकूण मतदारसंख्या ८८ लाख ४९ हजार ५९० आहे तर मुंबई उपनगरात ७६ लाख ८६ हजार ९८ मतदार आहेत. ठाण्यात ७२ लाख २९ हजार ३३९, नाशिक जिल्ह्यात ५० लाख ६१ हजार १८५ आणि नागपुरात ४५ लाख २५ हजार ९९७ मतदार आहेत.

पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या अधिक

रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. रत्नागिरीतील एकूण मतदार संख्या १३ लाख ३९ हजार ६९७ असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ४६ हजार १७६ आणि महिला मतदार ६ लाख ९३ हजार ५१० आहेत. नंदुरबारमध्ये एकूण मतदार १३ लाख २१ हजार ६४२ असून यामध्ये १३ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ५४ हजार ४१२ आणि महिला मतदार ६ लाख ६७ हजार २१७ आहेत.

गोंदिया जिल्ह्यात एकूण मतदार ११ लाख २५ हजार १०० असून यामध्ये १० तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख ५३ हजार ६८५ आणि महिला मतदार ५ लाख ७१ हजार ४०५ आहेत. भंडारा येथे एकूण मतदार १० लाख १६ हजार ८७० असून यामध्ये ४ तृतीयपंथींची नोंद आहे; पुरुष मतदार ५ लाख ६ हजार ९७४ आणि महिला मतदार ५ लाख ९ हजार ८९२ आहेत. सिंधुदुर्गात एकूण मतदार ६ लाख ७८ हजार ९२८ असून यामध्ये ३ तृतीयपंथींची नोंद आहे. पुरुष मतदार ३ लाख ३६ हजार ९९१ आणि महिला मतदार ३ लाख ४१ हजार ९३४ आहेत.

राज्यात ४.६९ कोटी महिला मतदार

राज्यात विधानसभेसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांची नोंद आहे ज्यामध्ये ५ कोटी २२ हजार ७३९ पुरुष, ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला आणि ६ हजार १०१ तृतीयपंथी मतदार आहेत.

५ जिल्ह्यात ३० लाखांहून अधिक मतदार

अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि औरंगाबाद या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. सोलापूरमध्ये ३८ लाख ४८ हजार ८६९, अहमदनगरमध्ये ३७ लाख ८३ हजार ९८७, जळगावमध्ये ३६ लाख ७८ हजार ११२, कोल्हापूरमध्ये ३३ लाख ५ हजार ९८ आणि औरंगाबादमध्ये ३२ लाख २ हजार ७५१ मतदार आहेत.

बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या १० जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत.

## आचारसंहिता भंगाच्या २४५२ तक्रारी निकाली २५३ कोटींची मालमत्ता जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण २४६९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी २४५२ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी–व्हिजिल ॲप हे कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या ॲपद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

२५३ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त

राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण २५३ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.

## झोनल अधिकारी कर्मचाऱ्यांची आढावा बैठक

### निवडणूक निरीक्षक नरेश झा व उपविभागीय अधिकारी प्रा. खडसे यांची उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ



**सिंदखेडराजा** : सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघातील झोनल अधिकारी तसेच कर्मचारी यांची सामान्य निवडणूक निरीक्षक नरेश झा यांच्या अध्यक्षतेखाली सिंदखेड राजा येथील पंचायत समिती सभागृह दि.४ नोव्हेंबर २०२४ रोजी आढावा बैठक संपन्न झाली.

यावेळी मार्गदर्शन करताना निरिक्षक नरेश झा यांनी प्रत्येक झोनल अधिकाऱ्यांनी आपापली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडून, विधानसभा निवडणुकीला प्राधान्य देऊन प्रक्रिया पूर्ण करावी, निवडणुकीसाठी लागणारे साहित्य तसेच पोलिंग बूथ वर लागणारे साहित्य या सर्वांचा आढावा घेऊन कोणतेही साहित्य कमी पडणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित सेल च्या अधिकारी यांना करण्यात आल्या. तसेच नरेश झा यांनी आचारसंहितेचे पालन करताना घ्यायची काळजी याबाबत मार्गदर्शन करून विधानसभा निवडणुकीला प्राधान्य देऊन सर्व प्रक्रिया यशस्वी रित्या पार पाडण्याचे आवाहन केले. या बैठकीला निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उमेदवारांना निवडणूक चिन्ह वाटप करण्यात आले, दुपारी ४ वाजता सामान्य निवडणूक निरीक्षक नरेश झा यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उमेदवारांना निवडणूक प्रक्रियेच्या सर्व बाबींची माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले. तसेच यावेळी उमेदवारांना ईव्हीएम मशीची तोंड ओळख करून दिली.तसेच बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅड मशीन हे कशाप्रकारे काम करते याबद्दल उपस्थित उमेदवारांना मार्गदर्शन केले.निवडणूक आयोगाने प्रत्येक उमेदवाराला ४० लाख रुपये पर्यंत खर्च करण्याची मुभा दिलेली आहे, उमेदवारांनी त्यांनी केलेल्या खर्चाचा हिशोब ठेवण्याकरिता त्यांना नोंदवही देण्यात आली निवडणूक खर्च निरीक्षक दानिश अब्दुल्ला हे दर तीन दिवसांनी या सर्व उमेदवारांच्या खर्चाचा आढावा घेणार असल्याचे सांगण्यात आले.या बैठकीला सिंदखेडराजा येथील तहसीलदार अजित दिवटे, देऊळगाव राजा येथील तहसीलदार वैशाली डोंगरजाळ, देऊळगाव राजा येथील गटविकास अधिकारी मुकेश माहोर,सामान्य निरीक्षक यांचे सहायक ढगे, सिंदखेड राजा येथील निवडणूक नायब तहसीलदार मनोज सातव, देऊळगाव राजा येथील निवडणूक नायब तहसीलदार प्रवीण घोटकर, सिंदखेडराजा येथील नायब तहसीलदार अस्मा मुजावर, सिंदखेड राजा येथील नायब तहसीलदार प्रवीणकुमार वराडे, देऊळगाव राजा येथील नायब तहसीलदार सायली जाधव, नायब तहसीलदार प्रांजल पवार, प्रभारी नायब तहसीलदार नितीन बढे, ईव्हीएम नोडल अधिकारी उद्धव मांटे, रामेश्र्वर कहाळे, प्रसार माध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के, संजय सोनुने तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.




# सिंदखेडराजात युतीचा अखेर खेळखंडोबाच; चौरंगी लढत होणार

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा** : सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघाच्या महायुतीच्या जागेसाठी सुरुवाती पासूनच प्रचंड नाट्यमय घडामोडी घडत युतीचा तिढा न सुटता बिगाडी होवून अखेर आज दि ४ नोव्हेंबर रोजी शिवनेचा व राष्ट्रवादी काँग्रेस (अप) पक्षाचे उमेदवारांनी उमेदवारी कायम ठेवल्याने खेळखंडोबाच झाला.आज विधानसभा सभेच्या निवडणुकीसाठी १७ उमेदवार रिंगणात असून १८ उमेदवारांनी मागार घेतल्याने आता चौरंगी लढत होणार आहे

युतीतील शिवसेनाचे डॉ शशिकांत खेडकर यांनी अर्ज भरला तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अप) पक्षाकडून मनोज कायंदे यांनी सुद्धा अर्ज भरल्याने येथे अगळा वेगळा किचकट दोहेरी पेच निर्माण झाला होता पण तो आज सुटेल असे वाटत असतांना मात्र सदर पेच सोडवण्यासाठी वरिष्ठ नेत्याकडून सदर उमेदवारांना कोणाही निरोप आला नसल्याने दोन्ही उमेदवारांची उमेदवारी कायम राहीली असल्याने येथे युतीचा खेळखंडोबा झाल्याचे चित्र असून युतीचे आपणच उमेदवार असून लढणार आणी जिंकणार अशीच भुमीका दोघांनाची आहे तसेच निवडणुक रिंगणामध्ये महाआघाडीकडून विद्यमान आमदार डॉ राजेंद्र शिंगणे हे एकमेव उमेदवार आहे वंचित बहुजन आघाडीकडून सौ सविताताई मुंडे तर अपक्ष म्हणून शिंगणे यांची पुतणी गायत्री शिंगणे ह्या सुद्धा रिंगणात आहेत त्यामुळे येथे अखेर चौरंगी लढत पाहायला मिळणार आहे.









### यांनी घेतली मागार

सुरज हनुमंते, डॉ सुनील कायंदे, डॉ शिवाजी मुंडे, डॉ शिवानंद भानुसे, अलका जायभाये, प्रल्हाद चोरमारे, ज्ञानेश्वर म्हस्के,मनसब पठाण, शेख रफिक,राजेंद्र मधुकर शिंगणे, दिलीप खरात, अभय चव्हाण, डॉ मनोहर खान पठाण, अशोक पडघन, ज्ञानदेव राठोड, प्रकाश गीते, अंकुर देशपांडे, विजय घोंगे.

### या उमेदवारांत होणार लढत

डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे पक्ष = राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श प),मनोज देवानंद कायंदे – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी( अ प), डॉ शशिकांत नरसिंगराव खेडकर पक्ष =शिवसेना, सविताताई शिवाजी मुंढे पक्ष =वंचीत बहुजन आघाडी, सुरेश एकनाथ गुमटकर पक्ष = जनहित लोकशाही पार्टी, दत्तात्रय दगडू काकडे अपक्ष ,सुनील पतींगराव जाधव अपक्ष, गायत्री गणेश शिंगणे अपक्ष ,दत्तू रामभाऊ चव्हाण अपक्ष,बाबासाहेब बन्सी म्हस्के अपक्ष, सुधाकर बबन काळे,अपक्ष भागवत देविदास राठोड अपक्ष, कुरेशी जुनैद रौफ शेख अपक्ष, अ. असिफ अ. अजीज अपक्ष,विजय पंढरीनाथ गवई अपक्ष, रामदास मानसिंग काहाळे अपक्ष, सय्यद मुबीन सय्यद नईम अपक्ष

## हॅप्पी बर्थडे किंग कोहली !

क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीचा आज ३६ वा वाढदिवस. किंग कोहलीला वाढदिवसाच्या सर्वप्रथम हार्दिक शुभेच्छा! क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०13 साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता. ज्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्न विचारण्यात आले की तुझा विश्र्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'विराट कोहली' सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती. निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि सचिनचा विश्वास सार्थ ठरविला. आज विराट देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढत आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात आले आहेत. सचिनच्या एकदिवसीय शतकांचा विक्रम त्याने नुकताच मोडला असून त्याच्या नावावर आता ५० एकदिवसीय शतक आहेत. त्याने त्याच्या कारकीर्दीत एकूण ८० शतक झळकावले आहेत. एकदिवसीय क्रिकेट प्रमाणेच विराट सचिनच्या एकूण १०० शतकांचा विक्रमही लवकरच आपल्या नावे करेल यात शंका नाही कारण आज त्याच्या नावे ८० शतके आहेत. कसोटीत त्याने २९ शतके झळकावली आहेत तर एकदिवसीय सामन्यात ५० शतके त्याच्या नावावर आहेत. टी २० सामन्यातही त्याचे एक शतक आहे. आज तो ३६ वर्षाचा होत आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी तीन –चार – वर्ष सहज खेळू शकतो. त्यामुळे तो हा विक्रम सहज मोडेल. विशेष म्हणजे त्याच्या जवळपास जगातील दुसरा कोणताच खेळाडू नाही. विराट केवळ विक्रमवीर नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा बारा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला विराट द रन मशिन कोहली असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते. धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. ऑस्ट्रेलियात झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा सामना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो. मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने ७० धावा काढून भारताला विश्व विजयी केले होते. या दोन खेळी फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत. टी २० विश्वचषकात भारताला विजय मिळवून देऊन त्याने क्रिकेट प्रेमिंचे एक स्वप्न पूर्ण केले आहे आता यावर्षी होणाऱ्या विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने भारताला अजिंक्यपद मिळवून द्यावे अशी क्रिकेटप्रेमींची त्याच्याकडून अपेक्षा आहे. सध्या तो त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नाहीये मात्र तो असा खेळाडू आहे जो कधीही फॉर्मात येऊ शकतो. तो लवकरच त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये परतेल आणि भारताला कसोटी आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवून देईल यात शंका नाही. विराटला पुन्हा एकदा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# सदैव मदतीला धावून येतात म्हणून तेली समाज बांधव आमदार संजय रायमुलकर यांच्याच पाठीशी : ॲड. गजानन क्षीरसागर

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी** : तेली समाज घटकांना आमदार संजय रायमुलकर यांनी गतकाळात सातत्याने सहकार्य केलेले आहे. सार्वजनिक हिताची कामे त्यांनी केली आहेत. म्हणून मेहकर, लोणार तालुक्यातील समस्त तेली समाज बांधव रायमुलकर यांच्याच पाठीशी राहतील ,अशी ग्वाही आम्ही देत आहोत. याचा आम्हाला अभिमानही आहे. ते सातत्याने आमच्यासाठी झटत आले आहेत आता आम्ही त्यांना काही देण्याची वेळ आली आहे ,असे विचार ॲड. गजानन क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

संताजी नवयुवक मंडळाच्या वतीने आयोजित दिवाळी समाजमिलन सोहळा आज संताजी नगर येथे पार पडला त्यावेळी बोलताना ॲड क्षीरसागर यांनी वरील विचार व्यक्त केले. सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी समाजाचे अध्यक्ष मधुकरराव गायकवाड होते. प्रारंभी संताजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वैयक्तिक व सामाजिक दृष्टीने महत्त्वाची अनेक कामे आमदार रायमुलकर यांनी केलेली आहेत .त्याबद्दल त्यांचा सत्कार संजय जुमडे यांच्या हस्ते करण्यात आला.

प्रास्ताविक भाषणात ॲड गजानन क्षीरसागर पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सर्वच निर्णय अतिशय धाडसी व लोकोपयोगी आहेत. लाडकी बहीण योजना शेतकऱ्यांसाठी पिक विमा कृषी, पंपांची वीज बिल माफी अशी अनेक उदाहरणे देता येतील. गेल्या पंधरा वर्षांपासून परिसरातील तेली समाज बांधव एकजुटीने आमदार रायमुलकर यांच्या पाठीशी राहिले आहेत व यापुढेही त्यांच्यासोबत राहण्याचा आमचा एकमुखी निर्णय आहे. निवडणुकीच्या निमित्ताने बाहेरगावच्या पार्सली निवडणूक रिंगणात उतरतात आणि नंतर पराभूत होऊन त्यांच्या गावी निघून जातात . परंतु केंद्रीय मंत्री प्रतापरावजी जाधव, आमदार संजय रायमुलकर आणि शिवसेनेचे पदाधिकारी हे मात्र अहोरात्र जनतेच्या सेवेत राबवत असतात, जनतेच्या सुखदुःखात सहभागी होत असतात, हे आम्ही नेहमी पाहतो. अचानक प्रकृती बिघडलेली असताना व हाताला सलाईनची हुक लावलेली असतानाही आमदार रायमुलकर आज आपल्या मेळाव्यात सहभागी झाले.समाज बांधवांना संजय रायमुलकर यांनी आज तागायत केलेल्या सहकार्याची अनेक उदाहरणे क्षीरसागर यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, मी कधीही जात–पात पाळली नाही. मतदार संघ हा माझा परिवार आहे, असे समजून सर्व समाज घटकांच्या उत्कर्षासाठी झटणारा मी माणूस आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मतदारसंघात विकास कामांच्या दृष्टीने त्यांची कुठलीही मदत मिळाली नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आगळे वेगळे व्यक्तिमत्व असून ते अहोरात्र राज्याच्या विकासासाठी कार्यरत राहतात. गेल्या दोन वर्षात मेहकर मतदार संघात साडेचार हजार कोटी रुपयांची विकास कामे त्यांच्या सहकार्यामुळे आम्ही करू शकलो. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणाचा चांगला प्रयत्न करण्यात आला असून पिकविम्या साठी पूर्वी शेतकऱ्यांना जास्तीची रक्कम भरावी लागत होती म्हणून महायुती सरकारने एक रुपयात पिक विमा योजना सुरू केल्यापासून बहुतांश शेतकरी याचा लाभ घेत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. कृषी पंपांच्या वीज बिल माफीसाठी शासनाने १५ हजार कोटींची तरतूद करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. केंद्रीय मंत्री प्रतापरावजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार संघाचा भरीव विकास करू शकलो याचे समाधान आहे. लोकांच्या हितासाठी अजून पुष्कळ काही साध्य करायचे आहे, असेही ते म्हणाले.

दिवाळी मिलन सोहळ्याला तेली समाज बांधवांची विक्रमी उपस्थिती होती. यावेळी श्रीकृष्ण वाघमारे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, राजाभाऊ पाखरे ,विष्णुपंत पाखरे, सुडके मामा ,विश्र्वनाथ पाखरे, डॉ. दिगंबर वऱ्हाडे,नागेश सोनुने, डॉ. गंगाधर क्षीरसागर, ॲड. राजबिंडे, नागेश राजबिंडे, कुंदन हुले ,वैजनाथजी तोंडे, हनीफभाई गवळी, विशाल डोंगरे ,मंगेश तट्टे ,विजय सोनुने, अरुण गायकवाड, श्रीकृष्ण व्यवहारे, रूपालीताई वडणकर, गजानन वडणकर ,संतोष तोंडे ,नंदकिशोर सुर्वे, प्रभाताई राजबिंडे ,संजय जुमडे ,प्रताप शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व सोनुने यांनी केले.

# निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता

**डॉ.किरण कुलकर्णी,**
अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांसाठीची केंद्रीय निवडणूक आयोगाने दि.१५ ऑक्टोबर पासून आदर्श आचारसंहिता लागू केली. नि:पक्षपाती वातावरणात निवडणूक पार पाडणे हा आदर्श आचारसंहितेचा भाग आहे. राज्यघटनेनुसार आपल्या देशात बहुपक्षीय लोकशाही अस्तित्वात आहे आणि कोणताही नागरिक ठरवून दिलेले निकष पूर्ण करीत असल्यास तो निवडणुकीस उभे राहू शकतो. अशा निवडणुकीसाठी उभे राहिलेले उमेदवार आणि विविध पक्षांचे उमेदवार यांच्यामधून आपला प्रतिनिधी निवडण्यासाठीचा मताधिकार भारतीय नागरिक निवडणूक प्रक्रियेतून बजावत असतात. आपल्या देशामध्ये असलेले विविध आर्थिक–सामाजिक गट आणि वेगवेगळ्या प्रकारची विषमता ही ऐतिहासिक आणि वर्तमान काळातही जाणवणारी वस्तुस्थिती आहे. राज्य घटनेने प्रत्येक नागरिकाला भेदरहित पद्धतीने समान मताधिकार दिलेला आहे. हा मताधिकार बजावताना नागरिकांवर कोणत्याही प्रकारचे दडपण / भीती अथवा दबाव असायला नको, कारण मताधिकार स्वेच्छेने वापरण्याचा अधिकार आहे. आपल्या देशातील सामाजिक गुंतागुंत आणि आर्थिक विषमता याचा विचार करता सर्व नागरिकांना दबावरहित मतदान करता यावे यादृष्टीने निवडणुकीसाठी संबंधित सर्वच घटकांनी (राजकीय पक्ष, उमेदवार, मतदार, निवडणूक यंत्रणा इ.) सजग राहणे आवश्यक आहे. मतदार म्हणून येणारा दबाव प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असू शकतो हे गृहित धरुन केंद्रिय निवडणूक आयोगाने निवडणूकीसाठी आदर्श आचारसंहितेची कल्पना प्रत्यक्षात आणली.

आदर्श आचारसंहितेचे अंतिम ध्येय मतदारांनी निर्भयपणे आणि कोणत्याही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबावास बळी न पडता मतदानाचा अधिकार बजावावा हेच आहे. यासाठी मतदान करण्याची प्रत्यक्ष संधी उपलब्ध होण्याबरोबरच कोणास मतदान करायचे याबाबत मतदार घेत असलेला निर्णय महत्वाचा असतो. हा निर्णय मतदारास विविध माध्यमांतून प्राप्त होणारी माहिती आणि भोवतालचे वातावरण यांच्यामुळे प्रभावित होत असे. निवडणूक लढणारे राजकीय पक्ष आणि उमेदवार यांना मतदारांपर्यंत पोहोचण्याची समान संधी आणि मतदाराच्या मनावर परिणाम करणाऱ्या माहितीची सत्यता यावर लक्ष दिले तरच मोकळ्या आणि निर्भीड वातावरणात निवडणुका होऊ शकतील. देशातील सर्व राजकीय पक्ष आणि निवडणुकीशी संबंधित सर्व घटक यांच्या सहमतीने तयार करण्यात आलेला स्वयंशिस्तीच्या नियमांचा आदर्श आचारसंहिता हा मसुदा आहे. आचारसंहितेचे उद्दिष्ट लक्षात घेता त्यातील तरतुदीचा शब्दश: अर्थ घेण्याबरोबरच त्या मागील उद्देश लक्षात घ्यायला हवा.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ मध्ये भारत निवडणूक आयोगावर देशातल्या संसद आणि विधिमंडळासाठीच्या निवडणुका सुव्यवस्थितरितीने पार पाडण्याची जबाबदारी दिलेली आहे. त्या अनुषंगाने आयोगाने आदर्श आचारसंहितेची कल्पना सर्वांच्या सहमतीने रुजवली आणि प्रत्यक्षात आणली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत काय करावे किंवा काय करु नये याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यावरुनच मतदानाचा अधिकार बजावणाऱ्या मतदारांवर सत्तारुढ, विरुध्द किंवा कोणत्याही राजकीय पक्षाकडून आणि कोणत्याही उमेदवाराकडून किंवा त्याच्या अनुयायांकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव येवू नये यासाठीचे प्रयत्न स्पष्टपणे जाणवतात. म्हणूनच राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, उमेदवारांचे समर्थक आणि इतरही प्रभावशील घटकांनी आपल्या कृतीमधून आणि प्रचारामधून मतदारांवर विशिष्ट उमेदवाराला मतदान करण्याचा किंवा न करण्याचा दबाव निर्माण होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. याचाच अर्थ असा की, उमेदवार किंवा पक्षाचा प्रचार करताना धोरणे आणि दृष्टीकोन याबाबत प्रचार असावा. प्रलोभने किंवा धाक नसावा. विरुद्ध पक्षाची आणि उमेदवारांची धोरणे आणि दृष्टीकोनावर टीका करता येईल पण वैयक्तिक किंवा गलिच्छ पद्धतीचा प्रचार करणे अपेक्षित नाही. निवडणुकीच्या वातावरणामध्ये विरोधात उभे असलेले उमेदवार एकमेकांचे शत्रू आहेत असे समजण्याचे कारण नाही. पातळी राखून दोन्ही बाजूने प्रचार होवू शकतो. धनदांडग्या आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांना प्रचार करण्यापासून लांब ठेवणे इष्ट आहे. मतदारांवर अनिष्ट प्रभाव टाकण्याचा प्रयत्न याच लोकांकडून होण्याची शक्यता असते.

दि.१५ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकांची घोषणा झाल्यावर त्याच क्षणाला आदर्श आचारसहिंतेची अंमलबजावणी सुरु झाला आणि नवी विधानसभा अस्तित्वात आल्यावर आदर्श आचारसंहितेचा कालावधी समाप्त होईल. आचारसंहितेच्या तरतूदींची पूर्तता केंद्र सरकार, राज्य सरकार याचबरोबर सर्व महामंडळे आणि शासकीय अर्थसहाय्यित सर्व संस्था यांना करावी लागते. आदर्श आचारसंहितेमधल्या सर्वसामान्य तरतूदी सर्वांनाच लागू होतात आणि त्यामध्ये निवडणूकीला उभे राहणाऱ्या इच्छुक उमेदवारांचाही समावेश होतो.

आदर्श आचारसंहितेने प्रत्येक व्यक्तीचा शांततापूर्ण आणि विनाव्यत्यय घरगुती जीवन जगण्याचा हक्क पूर्णपणे संरक्षित केलेला आहे. संबंधित यंत्रणेची योग्य पध्दतीने आगावू परवानगी घेऊन निवडणूक प्रचाराचे सर्व कार्यक्रम करणे राजकीय पक्षावर आणि उमेदवारावर बंधनकारक आहे. प्रचार मिरवणूकीमुळे वाहतुकीला अडथळा होणे अपेक्षित नाही. प्रचाराची किंवा मिरवणूकीची परवानगी म्हणजे सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडथळा आणण्याची परवानगी नव्हे ! सर्व राजकीय पक्षांना निवडणूक विषयक सभांसाठी मैदाने आणि आवश्यकता असल्यास हेलिपॅडची सुविधा सारख्या प्रमाणात उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. त्यामध्ये कोणत्याही एखाद्या पक्षाला अथवा उमेदवारासाठी झुकते माप देणे अपेक्षित नाही.

जातीवाचक भावनांना खतपाणी घालून मतदारांना आवाहन करता येणार नाही. थोडक्यात समाजातल्या कोणत्याही समाजघटकांमध्ये आपसात द्वेष भावना पसरुन तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती होवू नये असे आदर्श आचारसंहितेमध्ये नमूद आहे. इतर पक्षाचे नेते किंवा इतर उमेदवार यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या वैयक्तिक बाबींवर टिका आणि धार्मिक स्थळांवर प्रचार हा आचारसंहितेचा भंग मानला जातो. या तरतुदी करताना आचारसंहितेने भारतीय राज्यघटनेचे मार्गदर्शक तत्व यथायोग्य गिरवले आहे. भेदरहित मताधिकार प्रदान करणाऱ्या राज्यघटनेच्या पावलावर पाऊल ठेऊन भेदांचा आधार घेऊन होणारा प्रचार रोखला आहे. त्याचबरोबर मतदारांना आर्थिकदृष्ट्या किंवा इतर प्रकारे प्रलोभन दाखविणे प्रतिबंधित आहे. आर्थिक किंवा इतर प्रलोभन दाखवून ज्याने मते मिळविली तो खरोखरच लोकांचा प्रतिनिधी असणार आहे का? लोकांच्या आशा अपेक्षांचे सार्थ प्रतिबिंब त्यांच्याद्वारे सभागृहात पडू तरी शकेल का? त्यांच्या मनात पैशाने मते विकत घेतल्याची भावना राहणार. मतदाराने आपल्या मताची अशी किंमत घेणे हा तर राज्यघटनेचा अपमान !

आदर्श आचारसंहितेमध्ये सत्ताधारी पक्ष आणि शासकीय यंत्रणेवर काही बंधने घातली आहेत. सरकारी खर्चाने शासकीय योजनांची जाहीरात आचारसंहितेच्या कालावधीत करता येत नाही. सत्तारुढ पक्षाच्या मंत्र्यांना निवडणूक प्रचाराचे काम आणि शासकीय कामकाज यांची सरमिसळ करता येणार नाही. सरकारी कामकाजासाठी जनतेचा पैसा वापरला जातो आणि म्हणून सरकारी खर्चातून स्वत:ची, स्वत:च्या पक्षाची प्रसिध्दी करणे उचित नाही. आचारसंहितेचा तो भंग ठरतो.

सत्ताधारी पक्ष आणि सरकारी यंत्रणेने आचारसंहितेच्या काळात सजग राहणे अपेक्षित आहे. आचारसंहितेच्या काळात सरकारतर्फे राबविण्याच्या नव्या प्रकल्पांची अथवा कार्यक्रमांची घोषणा करता येत नाही. एवढेच नाही तर कुठल्याही प्रकारचे आर्थिक अनुदान किंवा त्यासंबंधीचे आश्र्वासन देता येत नाही. पायाभरणी समारंभासारखे कार्यक्रम आचारसंहितेच्या काळात निषिद्ध आहेत. याचाच अर्थ सत्तारुढ पक्षाच्या बाजूने मतदारांवरती प्रभाव पडू शकेल अशा गोष्टी प्रतिबंधित आहेत. निवडणूक काळात सरकारी यंत्रणा एखाद्या पक्षाच्या दावणीला बांधणे आचारसंहितेला अभिप्रेत नाही. असे असले तरी, पूर्णतेच्या टप्प्यावर असलेल्या सार्वजनिक हिताच्या बाबी वापरात आणण्यासाठी आचारसंहितेमुळे विलंब होऊ नये अशी भारत निवडणूक आयोगाची भूमिका आहे.

अंदाजपत्रकामध्ये तरतूद केलेली आहे किंवा राज्यपाल अथवा संबंधित मंत्र्यांच्या अर्थसंकल्पिय भाषणात उल्लेख आला आहे. याचा अर्थ त्या योजना जाहिर झाल्या किंवा उद्घाटन झाले असे समजू नये. निवडणूक काळात अशा योजनांची सुरुवात करण्यामागे मतदारांना प्रभावित करण्याचा हेतू स्पष्ट दिसतो. म्हणूनच तो आचारसंहितेचा भंग ठरतो. शासनाच्या नव्या योजनांना मान्यता देणे आचारसंहितेच्या कालावधीत अपेक्षित नाही. लाभार्थीकेंद्री योजनांचा आढावा घेणे आणि प्रक्रिया राजकीय पदाधिकाऱ्यांकडून होत असेल तर ते ताबडतोबीने थांबवून निवडणूका पूर्ण होईपर्यंत वाट पाहायला हवी. अशा योजना पूर्वीपासून चालू असल्या तरी हे बंधन लागू आहे. कल्याणकारी योजनांसाठी निधी आणि शासकीय कामांची कंत्राटे देता येणार नाही. त्यासाठी आयोगाची परवानगी घ्यावी लागेल.

सरकारी खजिन्यातून निधी खर्च होणारे कार्यादेश दिले गेले असतील तरी प्रत्यक्ष कामे सुरु झाली नसतील तर अशी कामे सुरु करता येणार नाहीत. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच कामे सुरु करता येतील. मात्र प्रत्यक्ष सुरु झालेली कामे चालू ठेवता येतील. पूर्ण झालेल्या कामांची देयके अदा करण्यास हरकत नाही. पण काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची पूर्णपणे खात्री होणे आवश्यक आहे.

खासदार आणि आमदार इत्यादींचे त्यांच्या निधीमधून घेण्यात आलेल्या वाहनांवरील नावे झाकायला पाहिजेत. अन्यथा अशी वाहने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असल्यास संबंधित खासदार, आमदार इत्यादींचा तो एक प्रकारचा निवडणूक प्रचार आहे, असे मानण्यात येईल. असा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये गणला जातो. यंदा विधानसभेच्या एका मतदारसंघासाठी उमेदवाराच्या निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा रु.४० लाख रुपये आहे.

आदर्श आचारसंहितेबाबत सर्व अधिकार, आचारसंहितेबद्दलचे सगळे निर्देश फक्त आयोग देऊ शकतो आणि मंत्रालय किंवा कोणतीही शासकीय यंत्रणा यांनी ते निर्देश लोकांपर्यंत पोहोचवित असते. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आयोगाचे प्रतिनिधीत्व करत असते. राज्यभरात आयोगाच्यावतीने निवडणूक संचालित करण्याचे काम पाहात असते. आचारसंहितेच्या कालावधीत राज्य सरकारकडून आयोगाकडे पाठविण्याचे सर्व संदर्भ राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून जातात.

आचारसंहितेच्या कालावधीत काही प्रकारची कामे संबंधित चालू ठेवण्यासाठी शासकीय यंत्रणेला आयोगापर्यंत जाण्याची आवश्यकता नाही. उदा.सर्व प्रकारच्या मान्यता आणि परवानग्या, प्राप्त झालेली आणि प्रत्यक्ष सुरु झालेली कामे किंवा लाभार्थींची नावे आचारसंहितेच्या आधीच जाहिर झालेले लाभार्थीसाठीचे प्रकल्प. रोजगार हमीची कामे पूर्वीपासून मंजूर असतील तर पूर्वी नोंदणी झालेल्या लाभार्थ्यांसाठी नवी कामे सुरु करता येतील किंवा चालू असलेल्या कामांमध्ये नोंदणीकृत लाभार्थ्यांना समाविष्ठ करुन घेता येईल. आवश्यक त्या प्रक्रिया पूर्ण झालेली आणि अर्थविभागाची सहमती असलेल्या कामांची देयके अदा करता येतील. जाहिर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील निविदांचे मूल्यमापन आणि अंतिम करण्याचे काम आचारसंहितेच्या कालावधीतसुध्दा करता येते. मात्र इतर निविदा जाहिर झालेल्या असल्या तरी त्या अंतिम करण्यासाठी आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक आहे.

नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, पूर, पिकांवरील किड यांसारख्या अनपेक्षित विपत्ती आणि वृध्दांसाठीच्या अथवा अपंगांसाठीच्या कल्याण योजना याबाबत मात्र आयोग मान्यता नाकारत नाही. अशा प्रकरणांमध्ये आयोगाची आगाऊ मान्यता आवश्यक असते. अशी मान्यता मिळाली तरी त्यातून सत्तारुढ पक्षाचा फायदा होईल असा प्रभाव पडू शकणारे समारंभ होणे अपेक्षित नाही. ही तरतूद म्हणजे आचारसंहितेचा मानवी चेहरा आहे.

नैसर्गिक आपत्ती आल्यास आवश्यक असणारी अनुदाने आणि पीडितांना दिलासा रक्कम पूर्वीच्याच दराने आणि प्रमाणात आयोगास कळवून देता येतात. दरांमध्ये आणि प्रमाणामध्ये बदल करावयाचा असल्यास मात्र आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. मुख्यमंत्री सहायता निधीतून गरजू आणि पात्र रुग्णांना त्यांची बिले अदा करण्यासाठी इस्पितळांना थेट अदायगी करता येईल. नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्यांना अडचणींतून सोडविण्यासाठी आवश्यक ते मदत कार्य आणि उपाय योजना आयोगास माहिती देऊन हाती घेता येतील.

>> पान ३

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# दुसऱ्या दिवशीही बाजीरावचा दबदबा, कमावले इतके कोटी

**मुंबई/प्रतिनिधी** : दिवाळी आली आणि अजय देवगण आणि रोहित शेट्टीचा बहुप्रतिक्षित मल्टीस्टारर चित्रपट 'सिंघम अगेन' देखील आला आहे. या चित्रपटाने प्रदर्शित होताच संपूर्ण बॉक्स ऑफिसवर खळबळ उडवून दिली आहे. चित्रपटात रणवीर सिंग, दीपिका पादुकोण, अक्षय कुमार, करीना कपूर खान, अजय देवगण, टायगर श्रॉफ अशी मोठी नावे आहेत. अशा मोठ्या नावांव्यतिरिक्त, या चित्रपटात बॉलीवूडचा भाईजान सलमान खानचा एक कॅमिओ देखील आहे, ज्याने रोहित शेट्टीच्या कॉप युनिव्हर्समध्ये दबंग फ्रँचायझी जोडण्याचे संकेत देखील दिले आहेत, ज्याने चाहत्यांना आणखी उत्तेजित केले आहे.

'सिंघम अगेन'चा मार्ग यावेळी इतका सोपा नव्हता, कारण यावेळी या चित्रपटाची स्पर्धा कार्तिक आर्यनच्या 'भूल भुलैया ३' या चित्रपटाशी होती. रोहित शेट्टीच्या या चित्रपटात रामायणाचा संदर्भ आहे, जो ट्रेलरमधूनच समोर आला होता, ज्यामुळे चाहत्यांमध्ये या चित्रपटाची प्रसिद्धी वाढली आणि दिवाळीला रिलीज होण्यापूर्वीच सिंघम अगेनने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. पहिल्या दिवशी रोहित शेट्टीच्या कॉप युनिव्हर्सच्या पाचव्या भागाने पहिल्या भागाचा विक्रम मोडला आहे. म्हणजेच अजय देवगणने स्वतः चा १० वर्ष जुना विक्रम मोडीत काढला आहे.

पान २ वरून...

## निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता

मात्र नैसर्गिक आपत्तीचे परिणाम रोखण्यासाठीचे प्रतिबंधात्मक उपाय (संरक्षक भिंतीची दुरुस्ती) हाती घ्यायचे असतील तर आयोगाची पूर्वपरवानगी घेणे गरजेचे आहे. एखादे क्षेत्र दुष्काळग्रस्त अथवा पूरग्रस्त जाहिर करायचे असेल तरी आयोगाची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. मुख्यमंत्री सहायता निधीतून अतिशय तातडीच्या शस्त्रक्रियांसाठी अथवा उपचारांसाठी वैद्यकिय सहाय्य देता येईल मात्र त्यासाठी सक्षम शासकीय अधिकाऱ्याने रुग्ण लाभार्थ्यांची निवड केलेली असली पाहिजे. वीज दरांबाबत निर्णय घेण्यासाठीची प्रक्रिया आचारसंहितेच्या काळात करता येईल पण निवडणूका पूर्ण झाल्यावरच ते सुधारित दर लागू करता येतील. केंद्रीय अथवा राज्य लोकसेवा आयोगासारख्या वैधानिक संस्थांनी भरती प्रक्रिया चालू ठेवायला हरकत नाही. पण त्या व्यतिरिक्तच्या संस्थांमार्फत होणाऱ्या भरती प्रक्रियेसाठी आयोगाची पूर्वपरवानगी लागेल.

निवडणूक प्रक्रियेमध्ये शासकीय यंत्रणेमधील अधिकाऱ्यांचा मोठा सहभाग असतो. आचारसंहितेने अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत निर्देश दिलेले आहेत. गृह जिल्ह्यात पदस्थापना असलेले अधिकारी आणि गेल्या चार वर्षांपैकी तीन वर्षे एकाच जिल्ह्यात पदस्थापना असलेले अधिकारी यांचा निवडणूक प्रक्रियेशी प्रत्यक्ष संबंध असल्यास त्यांना जिल्ह्याबाहेर बदली करण्याच्या सूचना आहेत. निवडणूक संचालनामध्ये सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांवर आचारसंहितेदरम्यान पूर्णत: बंदी असते. याबाबत निर्णय घेण्याचे सर्वाधिकार आयोगाचे आहे. सत्ताधारी राजकीय पदाधिकाऱ्यांनी कार्यालयीन यंत्रणेचा आचारसंहितेच्या काळात वापर करणे अपेक्षित नाही. मतदारांवरती प्रभाव पडेल अशी कृती होऊ न देण्याची काळजी सर्वच राजकीय पदाधिकाऱ्यांनी घेणे अपेक्षित आहे. सरकारी कार्यालयांमध्ये लावलेली राजकीय नेत्यांची छायाचित्रे आचारसंहितेच्या कालावधीत प्रदर्शित करु नयेत. स्थानिक स्वराज्य संस्था उदा.महानगरपालिका, नगरपरिषदा आणि पंचायती यांच्या अटळ अशा वैधानिक सभा बोलाविण्यास परवानगी आहे. परंतु, त्यामध्ये कोणतेही नविन धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. शासकीय विश्रामगृहांचा वापर निवडणूक कार्यासाठी करता येणार नाही किंवा तिथे कोणताही राजकीय उपक्रम राबविता येणार नाही. हाच नियम

शासकीय सार्वजनिक उपक्रमांच्या अतिथीगृहांसाठी लागू आहे.

आचारसंहितेमधील तरतुदी सर्वांना माहित असायला पाहिजेत. आचारसंहितेचा भंग सिद्ध झाला, तर काय होते ? आचारसंहितेचे गांभीर्य प्रस्थापित होण्यासाठी काय व्यवस्था आहे ? याचे उत्तर असे की, आचारसंहिता राज्यघटनेशी आणि केंद्राच्या / राज्याच्या कायद्यांशी सुसंगत आहे. त्यामुळे आचार संहितेमधल्या तरतुदींचा भंग हा संबंधित कायदयाचा भंग ठरतो आणि त्या त्या कायद्यातल्या तरतुदीनुसार त्याबद्दल कारवाई केली जाते. आचारसंहितेमध्ये दोन समाज घटकांमध्ये आपसांत द्वेषभावना पसरुन तणाव निर्माण होईल अशी कृती होऊ नये, असे नमूद आहे. त्यामुळे कोणी अशी कृती करत असल्यास तो आचारसंहितेचा भंग ठरतो तसेच फौजदारी कायद्याअंतर्गत गुन्हा देखील ठरतो. आचारसंहितेमधील मतदारांना प्रलोभन अथवा धाक दाखविण्याच्या गुन्ह्याबाबत भारतीय दंड संहितेमधील कलमांनुसार फौजदारी कारवाई केली जाते. तसेच, निवडणूक विषयक चुकीची माहिती, बेकायदेशीर खर्च इत्यादी गुन्ह्यांबाबत म्हणता येईल.

लोकप्रतिनिधीत्व कायद्यामध्ये मतदान संपण्यापूर्वीच्या ४८ तासांचा शांतता कालावधी पाळला नाही तर शिक्षेची तरतूद आहे. राज्यपातळीवरील कायद्याचे उदाहरण द्यायचे झाले तर महाराष्ट्र राज्याचा मालमता विरुपण प्रतिबंधक कायद्याचे उदाहरण देता येईल. खाजगी मालमत्तेवर मालकाच्या परवानगीशिवाय फडकणारे बॅनर्स आणि सार्वजनिक मालमत्तेवर एखाद्या राजकीय पक्षाच्या पोस्टरचे अस्तित्व अशासारखे गुन्हे या कायद्याअंतर्गत दखलपात्र ठरतात.

लोकप्रतिनिधी व कायदा, १९५१ हा संसदेचा कायदा आहे. त्यामध्ये संसदेची दोन्ही सभागृहे आणि प्रत्येक राज्यामधील विधीमंडळाची सभागृहे यांमधील सभासदत्वाची पात्रता, अपात्रता आणि गैरव्यवहार आणि या निवडणुकांशी संबंधित इतर गुन्हे, याबद्दलच्या तरतुदींचा समावेश आहे. लोकप्रतिनिधी व कायदा, १९५१ च्या कलम १३१ व १३२ अंतर्गत, पोलिस अधिकारी गुन्हेगारांवर कारवाई करु शकतात.

लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ चे कलम १२६ अन्वये, मतदान संपण्यापूर्वीच्या ४८ तासांच्या कालावधीत सार्वजनिक सभा, मिरवणुका इत्यादीद्वारे निवडणूक प्रचार करण्यावर बंदी आहे. तसेच टेलिव्हिजन आणि इतर माध्यमांद्वारे निवडणुकविषयक मजकूर प्रदर्शित करण्यास मनाई आहे. मतदानाचा एक दिवस आधी शांतता कालावधी म्हणून अमलात यावा, ही यामागची भूमिका आहे.

४८ तासांच्या शांतता कालावधीत, स्टार प्रचारक आणि इतर राजकीय नेत्यांनी पत्रकार परिषदांद्वारे प्रसारमाध्यमांना संबोधित करणे आणि निवडणुकीच्या मुद्यांवर मुलाखती देणे हे टाळावे. मतदानाच्या समाप्तीसाठी निश्र्चित केलेल्या ४८ तासांच्या कालावधीत कोणत्याही जाहीर सभा घेता येणार नाहीत आणि मिरवणुका काढता येणार नाही. शांतता कालावधीमध्ये ओपिनियन पोल प्रसिद्ध करता येत नाही. एक्झिट पोल शेवटच्या टप्प्यातील निवडणुकीचे मतदान संपल्यावरच प्रसिध्द करता येतो.

# स्वत:च्या हत्येचा बनाव करून मित्राची हत्या करणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी केले जेरबंद

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : सारंगपूर शेत शिवारात एका अज्ञात व्यक्तीचा खुन करून पुरावा नष्ट करण्याच्या केला प्रयत्न उददेशाने एक पुरूष जातीचे मानवी मृतदेह आढळून आला आहे अशी माहिती वरीष्ठ अधिकारी स्थानिक पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा यांना मिळाली असता त्यांनी पाहणी केली. तर एक पुरूष जातीचे शरीर त्याचा चेहरा व इतर अवयव जाळून त्याची अत्यंत क्रुर हत्या करुन त्याठिकाणी टाकून दिले असल्याचे आढळून आली. त्या मुतदेहावरील कपड्यांमध्ये पाकिट, पॅन कार्ड, आधार कार्ड असा दस्तऐवज मिळून आला



होता. मृतदेहावर महेश रमेश माठे याचेच अंगावरील कपडे घातलेले आढळून आले. यावरून सदरचा मृतदेह हा महेश रमेश माटे राहणार वझर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर याचा असल्याचे प्राथमिक तपासामध्ये आढळून आले. नमूद मृत देहाबाबत सखोल चौकशी केली असता असे समजले की, नमूद मृतदेह हा महेश रमेश माठे रा. वझर याचा नसून नमूद मृतदेह हा अमोल शिवनाथ उघडे वय १७ वर्ष रा. कदीम शहापूर ता. गंगापूर याचा असल्याचे समजले. यावरून सदर प्रकरणी पोलीस ठाणे गंगापूर गुरनं. ५३०/२०२४ कलम १०३, २३८ भारतीय न्याय संहीता अन्वये दिनांक ०२/११/२०२४ रोजी मयत इसमाची आई सुनिता भ्र. शिवनाथ उघडे रा. कदीम शहापूर यांचे फिर्यादीवरून दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी भेट देऊन स्थानिक गुन्हे शाखा, व स्थानिक पोलीस ठाणे येथील अधिकारी यांना गुन्हा उघडकीस आणण्यात व तपासा बाबत मार्गदर्शन केले त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी अधिकारी सतीष वाघ यांचे नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन इंगळे व पोलीस अंमलदार तसेच पोलीस ठाणे गंगापूर येथील कुमारसिंग राठोड यांचे नेतृत्वाखाली पीएसआय काळे, पीएसआय झोरे व अंमलदार अशा वेगवेगळ्या तीन टीम तयार करून यांनी तपासास सुरवात केली व मृतकाची संपुर्ण माहिती घेऊन, मृतकाचे मित्र, जाण्या येण्याच्या जागा, व्यवसाय कामधंदा करण्याच्या जागा, नातेवाईक यांची कशोसीन चौकशी केली. मिळालेल्या माहितीवरुन मयत अमोल शिवानाथ उघडे हा महेश रमेश माटे राहणार वझर याचा मित्र असून तो दिनांक ३१/१०/२०२४ रोजी रात्री उशिरा घराबाहेर गेला होता व त्यानंतर तो घरी परतला नव्हता. त्यावरून इसम नामे महेश रमेश माठे याच्याबाबत अधिक माहिती घेवून त्याचा शोध घेतला असता तो मिळून आला. त्यास मोठ्या शिताफीने ताब्यात घेवून नमूद घटनेसंदर्भात विश्र्वासात विचारपूस केली असता तो व त्याचा मित्र किशोर रमेश बर्डे यांनी मिळून त्यास दारू पाजून, त्याचा गळा आवळून हत्या केल्याचे निष्पन्न झाले. तसेच मृतदेह हा महेश रमेश माटे याचा असल्याचा बनाव करण्यासाठी त्याचे कपडे बदलून, मृतदेहाचा चेहरा व इतर शरीराचे अवयव जाळून ओळख नष्ट करावी या उद्देशाने जाळले. नमूद आरोपीस खुनाचे कारणाबाबत अधिक विचारपूस केली असता महेश माठे याचे एका मुलीसोबत प्रेमसंबंध असून मुलीचे घरच्याकडून होणाऱ्या विरोध थांबवण्यासाठी स्वत:चा खुन झाला आहे असे त्यांने भासवण्याचा प्रयत्न केला होता.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४; जिल्ह्यात ११५ उमेदवारांमध्ये लढत तर ७२ उमेदवारांची माघार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सातही मतदारसंघात नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याच्या आजच्या अंतिम दिवशी ७२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे सातही मतदारसंघाकरिता आता ११५ उमेदवारांमध्ये निवडणूकीची लढत होणार आहे.

नामनिर्दिष्ट उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले, ते याप्रमाणे : मलकापूर येथे ७, बुलढाणा येथे ८, चिखली येथे १८, सिंदखेड राजा येथे १८, मेहकर येथे ११, खामगांव येथे ४ व जळगांव जामोद येथे ६ असे एकूण ७२ उमेदवारांचे नामनिर्देशन उमेदवारी मागे घेतले.

तर मलकापूर येथे १५, बुलढाणा येथे १३, चिखली येथे २४, सिंदखेड राजा येथे १७, मेहकर येथे १९, खामगांव येथे १८ व जळगांव जामोद येथे ९ असे एकूण ११५ उमेदवारांमध्ये लढत होणार आहे.

मागे घेतलेले उमेदवार

२१- मलकापूर विधानसभा मतदारसंघ : संदिप देविदास फाटे(अपक्ष), मोहम्मद दानीश अब्दुल रशीद (अपक्ष), विरसिंह ईश्वरसिंह राजपुत (अपक्ष), सुनिल वसंतराव विंचनकर (अपक्ष), सचिन दिलीप देशमुख (अपक्ष), सौरभ चंद्रवदन इंगळे (अपक्ष), हरीश महादेवसिंह रावळ (अपक्ष).

२२- बुलढाणा विधानसभा मतदारसंघ : प्रमोद पुंजाजी कळसकर (अपक्ष), स्वाती विष्णू कंकाळ (अपक्ष), प्रा. सदानंद मन्साराम माळी (अपक्ष), जितेंद्र एन. जैन. (अपक्ष), प्रा. रतन आत्माराम कदम (अपक्ष), विजयराज हरिभाऊ शिंदे (अपक्ष), डॉ. मोबीन खान अय्युब खान (अपक्ष), आरिफ खान विवन खान (अपक्ष).

२३ -चिखली विधानसभा मतदारसंघ : नरहरी ओंकार गवई (अपक्ष), नाजेमा नाज इम्रान पठाण (अपक्ष), अब्दुल रियाज अब्दुल समद सौदागर (अपक्ष), सौ. वृषाली राहुल बोंद्रे (अपक्ष), रविंद्र नारायण डाळीमकर (अपक्ष), मृत्युंजय संयज गायकवाड (अपक्ष), मनोज सारंगधर लाहुडकर (अपक्ष), सतीश मोतीराम गवई (अपक्ष), बबन डिगांबर राऊत (अपक्ष), विनायक रामभाऊ सरनाईक -अंभोरे(अपक्ष), शरद रमेश खपके (अपक्ष), सिध्दार्थ अंकुश पैठणे (अपक्ष), देवानंद पांडुरंग गवई (अपक्ष), मिलींदकुमार सुधाकर मघाडे (अपक्ष), नितिन रंगनाथ इंगळे-राजपूत (अपक्ष), संजय धोंडु धुरंधर (अपक्ष), अब्दुल वाहीद शे. इस्माईल (अपक्ष), राजेंद्र सुरेश पडघान (अपक्ष).

२४- सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघ : डॉ. मनोरखा रशीदखा पठाण (अपक्ष), शेख रफिक शेख शफी (अपक्ष), अभय जगाराव चव्हाण (अपक्ष), विजय प्रतापराव घोंगे (अपक्ष), मनसब खान सादतमीर खान पठाण (अपक्ष), राजेंद्र मधुकर शिंगणे (अपक्ष), शिवाजी बाबुराव मुंढे (अपक्ष), शिवानंद नारायण भानुसे (संभाजी ब्रिगेड पार्टी), प्रकाश भिवाजी गिते (बहुजन समाज पार्टी), अशोक श्रीराम पडघान (अपक्ष), ज्ञानेश्र्वर कैलास म्हस्के(अपक्ष), नामदेव दगडू राठोड (अपक्ष), सुनील तोताराम कायंदे (अपक्ष), सुरज धर्मराव हनुमंते (अपक्ष), अंकुर त्र्यंबक देशपांडे (अपक्ष), अल्का रामप्रसाद जायभाये (अपक्ष), भाई दिलीप ब्रम्हाजी खरात (अपक्ष), प्रल्हाद रंगनाथ सोरमारे (अपक्ष).

२५- मेहकर विधानसभा मतदारसंघ : नरहरी ओंकार गवई (अपक्ष), डॉ. सांची सिध्दार्थ खरात (अपक्ष), प्रकाश गणपत अंभोरे (अपक्ष), लक्ष्मणराव जानुजी घुमरे (अपक्ष), मुरलीधर दगडू गवई (अपक्ष), वामनराव सुर्यभान वानखेडे (अपक्ष), डॉ. गोपालसिंह बछीरे (अपक्ष), प्रकाश चिंधाजी गवई (अपक्ष), डॉ. जानु जगदेव मानकर (अपक्ष), रजनिकांत सुधीर कांबळे (राष्ट्रीय समाज पक्ष), कैलास कचरु खंदारे (अपक्ष).

२६-खामगांव विधानसभा मतदारसंघ : अँड. रवींद्र भोजने(अपक्ष), अमोल अशोक अंधारे (अपक्ष), शिवशंकर पुरुषोत्तम लगर(महाराष्ट नवनिर्माण सेना), किरण रामचंद्र मोरे(अपक्ष).

२७ जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघ : अमित रमेशराव देशमुख (महाराष्ट्र नवनिर्माणना), अरुण भिकाजी निंबोळकर(अपक्ष), पवन भाऊराव गवई (अपक्ष), देवानंद शंकर आमझरे (अपक्ष), मंगेश विश्र्वनाथ मानकर (अपक्ष), डॉ. संदिप रामदास वाकेकर (अपक्ष).

# नांदेड दक्षिण मतदार संघातील उमेदवारांच्या खर्चाची ७, ११, १५ नोव्हेंबरला प्रथम, द्वितीय, तृतीय तपासणी

**नांदेड/प्रतिनिधी:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने ८७-नांदेड दक्षिण मतदार संघातील उमेदवारांची खर्च निरीक्षक यांच्या समोर निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी गुरुवार ७ नोव्हेंबरला, द्वितीय तपासणी ११ नोव्हेंबरला तर तृतीय तपासणी १५ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ यावेळेत निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय ८७-नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ चिखलवाडी नांदेड येथे होणार आहे. भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकांनुसार ही तपासणी होईल. या तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षक यांच्यासमोर सादर करणे आवश्यक आहे.

अनुपस्थित राहणारे उमेदवार भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकांनुसार कार्यवाहीस पात्र असतील. तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवणे व दाखल करण्याच्या कायद्याच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने कसूर केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम १० क अन्वये तो निवडणूक आयोगाकडून तीन वर्षाच्या कालावधीसाठी निरर्ह ठरविण्यास पात्र असेल, याची नोंद घ्यावी.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार एकतर तो स्वतः /ती स्वतः किंवा त्याच्या / तिच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे त्याला / तिला नामनिर्देशित करण्यात आले आहे, त्या दिनांकापासून निवडणुकीचा निकाल लागण्याच्या दिनांकापर्यंत दोन्ही दिनांक धरून, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे, असे असे निवडणूक निर्णय अधिकारी ८७-नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# निवडणूक खर्च निरिक्षकांची माध्यम कक्षाला भेट

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणूकीसाठी जिल्ह्यात दाखल झालेले निवडणूक खर्च निरिक्षक दानिश अब्दुल्लाह यांनी आज माध्यम कक्षास भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. माध्यम कक्षातील कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले. सहायक माहिती अधिकारी सतिश बगमारे यांनी माध्यम कक्षाविषयी सविस्तर माहिती दिली.

निवडणूक निरिक्षक दानिश अब्दुल्लाह म्हणाले की, निवडणूकीत उभे असलेल्या उमेदवारांच्या राजकिय जाहिरातीचे काटेकोर निरिक्षण करुन खर्चाचा नोंदी वेळोवेळी खर्च कक्षास सादर करावे. पेड न्यूज व सामाजिक माध्यमावरील पोस्ट याबाबत जागरुक राहून त्याची माहिती वेळोवेळी आयोगाला द्यावी. तसेच उमेदवारांकडून जाहिरात प्रमाणिकरणासाठी अर्ज आल्यास तात्काळ छाननी करुन प्रमाणपत्र द्यावे. समाज माध्यमांवर प्रसिद्ध होणारे जाहिराती, फेक न्युज, आक्षेपार्ह बातमीवर बारीक लक्ष ठेवण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.



यावेळी त्यांचे सोबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा खर्च कक्षाचे नोडल अधिकारी प्रकाश राठोड, कोषागार अधिकारी ऋषीकेश वाघमारे तसेच माध्यम कक्षातील सायबर सेलचे आनंद हिवाळे, वरिष्ठ लिपीक प्रेमनाथ जाधव, प्रतिक फुलाडी, लिपीक सौरभ बढीये, संतोष पडघान, राहुल सुरडकर, सचिन पवार, प्रमोद राठोड, राम पाटील, राजू घाडगे आदी उपस्थित होते.

# मेहकर मतदारसंघात तिरंगी लढतीचे चित्र; संजय रायमुलकर, सिद्धार्थ खरात व डॉ.ऋतुजा चव्हाण यांच्यात प्रमुख लढत

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर विधानसभा मतदारसंघात तब्बल १९ उमेदवार आमदारकीचे स्वप्न उराशी बाळगून आपले नशीब आजमावत आहेत. तर दि.४ नोव्हेंबर रोजी ११ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने प्रमुख लढतीतील शिवसेना शिंदे गटाकडून संजय रायमुलकर, शिवसेना उबाठाकडून सिद्धार्थ खरात तर वंचितकडून डॉ.ऋतुजा चव्हाण ह्या प्रमुख लढतीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. इतरही उमेदवार आपले नशीब आजमावत असले तरी मेहकर मतदार संघात होणरी निवडणूक ही तिरंगी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मेहकर मतदार संघ हा तसा शिवसेनेचा







बालेकिल्ला असून हा गड पुन्हा आपल्या ताब्यात घेण्यासाठी शिंदे शिवसेनेकडून संजय रायमुलकर हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. तर उबाठा शिवसेनेकडून आपला पारंपारिक मतदारसंघ आपल्या ताब्यात घेण्यासाठी मंत्रालयीन सहसचिव पदावरून सेवानिवृत्ती घेतलेले सिद्धार्थ खरात मैदानात उतरले आहेत. तर वंचित कडून डॉ.ऋतुजा चव्हाण यांनी निवडणुकीत आपले नशीब आजमावित आहेत. यासह भय्यासाहेब गोविंदराव पाटील हे महाराष्ट्र नवनिर्माण सेना, संजय समाधान कळसकर हे बहुजन समाज पार्टी, दीपक केदार हे महाराष्ट्र स्वराज्य पार्टी, नितीन सदावर्ते हे जय सेवालाल बहुजन विकास पार्टी, संघपाल पनाड रिब्लिकन सेना, संदीप शामराव खिल्लारे हे आजाद समाज पार्टी,तर अपक्ष म्हणून अशोक हिवाळे, अॅड्.ओम श्रीराम भालेराव, सिद्धार्थ प्रल्हाद खरात, डॉ. जितेश साळवे, देविदास पिराजी सरकटे, पूनम विजय राठोड, प्रा.भास्कर गोविंदा इंगळे,महिपत पुंजाजी वाणी,राजेश अशोकराव गवई, डॉ.संतोष तायडे आदी उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. मेहकर मतदार संघात तब्बल १९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असले तरी प्रमुख लढत ही तिरंगी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिंदे शिवसेनेकडून संजय रायमुलकर, उबाठा शिवसेनेकडून सिद्धार्थ खरात तर वंचित बहुजन आघाडीकडून डॉ. ऋतुजा चव्हाण यांच्यात प्रमुख लढत होण्याची शक्यता वर्तवली जात असून या तिघांमध्येच रस्सीखेच होण्याचा अंदाज राजकीय तज्ञ बांधत आहेत. आता निवडणुकीचा घोडा मैदान सामने असून अवघ्या पंधरा दिवसावर निवडणूक आल्याने मतदारा प्रचारातही गुलाबी थंडीत रंगत चढत चालली आहे. तर प्रत्येक उमेदवाराचे पदाधिकारी, कार्यकर्ते हे आपल्याच उमेदवार निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करीत पायाला भवरा लावल्यासारखे मतदार संघात फिरत असल्याचेही दिसून येत आहे. आता प्रचारात कोण आघाडी घेतो आणि कोण कशी मात करतो याकडे मेहकर मतदार संघातील जनतेचे लक्ष लागलेले आहे.

# सर्व मिळून महाविकास आघाडीच्या उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करू

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण घुमरे यांचा विश्वास : महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त पत्रकार परिषदेत ग्वाही

दैनिक आपला विदर्भ







**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीकडून अनेक उमेदवार इच्छुक असतानाही पक्षाचा आदेश सर्वश्रेष्ठ मानून व पक्ष संघटन वाढवण्यासाठी पक्षाचा उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्व मिळून महाविकास आघाडीचा उमेदवार सिद्धार्थ खरात यांना प्रचंड मताने विजयी करू, असा विश्र्वास काँग्रेसचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण घुमरे यांनी व्यक्त केला. तसेच यावेळी इतर मान्यवर मनोगत व्यक्त करून महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करू अशी ग्वाही दिली. उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर महाविकास आघाडीच्या उमेदवारांची दि.४ नोव्हेंबर रोजी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणण्याची या संयुक्त पत्रकार परिषदेत ग्वाही दिली.

यावेळी शिवसेना उबाठाचे पदाधिकारी तसेच इच्छुक उमेदवार डॉ. गोपाळराव बच्छिरे म्हणाले की, शिवसेना विखुरल्यानंतर एकही नाव समोर येत नसताना शिवसेनेच्या निष्ठावंत पदाधिकाऱ्यांनी जीवाचे रान करून रक्ताचे पाणी करून शिवसेना वाढवली, तेव्हा शिवसेना स्वबळावर स्वतःच्या पायावर उभे राहिली, परिस्थिती बदलली. ज्यावेळेस एकही उमेदवार चे नाव समोर येत नसताना शिवसेना उभी राहिल्यानंतर तब्बल १२ उमेदवारांची नावे चर्चेत आली. शिवसेना उभी करण्यासाठी मेहकरचे निंबाजी पांडव, किशोर गारोळे, लोणारचे शहर प्रतिनिधी गजानन जाधव, अड्. दीपक मापारी यांनी प्रचंड मेहनत घेत शिवसेना पुन्हा उभी केली.त्यामुळे शिवसेनेकडून इच्छुकांची संख्याही वाढली. कोणतेही काम एकटा व्यक्ती पूर्ण करू शकत नाही, आम्ही निष्ठावंतांनी शिवसेना पुन्हा उभी केली आहे. अनेक जण मेहकर लोणार मतदार संघातून विधानसभा लढवण्यासाठी इच्छुक असताना आम्ही पक्षाचा आदेश अंतिम आदेश माणून मान्य केला. आमच्यासाठी पक्षाचा आदेश हा अंतिम आहे. आम्ही अपक्ष लढून जिंकण्यासाठी तयार होतो. परंतु शिवसेना प्रमुख हे आमचा विठ्ठल असून आमची पंढरी मातोश्री आहे. त्यांचा आदेश आम्ही अंतिम म्हणून त्यांच्या आदेशाचे नतमस्तक होऊन पालन केले,

मान दिला. शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मला आदेश दिला की गोपाराव थांबावे लागेल. मी या आदेशाचे मी नतमस्तक होऊन पालन करत थांबलो, आम्ही उबाठा शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस व सर्व मित्र पक्षाचे पदाधिकारी यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा विजय करण्यासाठी एकदिलाने हा निर्णय घेतलेला आहे. तर गेल्या १५ वर्षात मेहकर आणि लोणार विकास दूर गेला आहे. याबाबत तर मी मीडियासमोर ओपन चॅलेंज केले होते. गेल्या पंधरा वर्षात काय विकास झाला हे समोरासमोरं बसून चर्चा करू परंतु ते मी माझ्यासाठी बोलत होतो. परंतु आता शिवसैनिकासाठी बोलावे लागणार आहे. शिवसेनेमध्ये शिवसैनिक मोठा असतो, तो कोणत्या पदावर आहे ते महत्त्वाचे नाही, त्यामुळे शिवसेनेचा उमेदवार व महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करून सर्व क्लुप्त्या वापरून आम्ही महाविकास आघाडीचा उमेदवार प्रचंड मताने विजय करू असा विश्र्वासही यावेळी डॉ. गोपाळराव बच्छिरे यांनी व्यक्त केला. तसेच यावेळी उबाटाचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी मनोगत व्यक्त करताना मुरलीधर गवई, प्रकाश अंभोरे, डॉ. जानू मानकर, डॉ. गोपाळराव बच्छिरे , कैलास खंदारे, लक्ष्मण घुमरे, वामनराव वानखेडे, सांची खरात, रजनीकांत कांबळे, नरहरी गवई, प्रकाश गवई यांनी महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. केले तसेच यातील रजनीकांत कांबळे, नरहरी गवई, प्रकाश गवई, हे महाविकास आघाडीशी संबंधित उमेदवार नसतानाही त्यांनी महाविकास आघाडीला पाठिंबा देण्यासाठी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले असल्याचे सांगून ते यावेळी उपस्थित नसले तरीही योग्य वेळी ते पत्रकार परिषद घेऊन आपला खुलासा करणार असल्याचेही सिद्धार्थ खरात यांनी सांगितले. तसेच यावेळी प्रकाश अंभोरे, डॉ. गोपाल बच्छिरे, लक्ष्मण घुमरे, डॉ. जानू मानकर यांनी महाविकास आघाडीसाठी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले, यातील डॉ. जानू मानकर, डॉ. गोपाल बच्छिरे हे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील प्रबळ दावेदार असतानाही त्यांनी महाविकास आघाडीचे पक्ष हित लक्षात घेत उमेदवारी अर्ज मागे घेऊन माझ्यामा मागे एक मोठी शक्ती उभी केली आहे.हे उमेदवार या मतदार संघातील प्रबळ दावेदार उमेदवार असून त्यांचा मतदारसंघात मोठा चाहता वर्ग आहे. तरीही त्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. त्यामुळे विरोधकांचा जो नॅरीटिव्ह पसरवित होते तो आता संपला असून महाविकास आघाडीची शक्ती वाढली आहे. त्यामुळे मतदार संघात परिवर्तनाचे वारे प्रचंड वेगाने वाहू लागले आहेत. सर्व मान्यवरांनी मला पाठिंबा देऊन केवळ जिंकण्यासाठीच माझ्या मागे उभे राहिले आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण घुमरे यांनी सभा घेत व डॉ. गोपाल बच्छिरे. अंभोरे या सर्व उमेदवारांनी महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी एकत्र येऊन मोठी शक्ती उभी केली आहे. त्याबद्दल उबाठाचा उमेदवार या नात्याने सिद्धार्थ खरात यांनी आभार व्यक्त केले. या पत्रकार परिषदेला महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### माजी गृहमंत्री अनिल यांनी दुसरे उमेदवार अनिल देशमुख यांच्या घरासमोर घेतली पत्रकार परिषद



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर राष्ट्रवादीचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या काटोल विधानसभा मतदारसंघातील अनिल देशमुख (डुप्लिकेट) यांच्या घरासमोर घेतलेली प्रेस. (डुप्लिकेट) अनिल देशमुख गेल्या चार दिवसांपासून बेपत्ता.पोलिसांनी त्यांच्या कुटुंबीयांना सुरक्षा पुरवली.नागपुरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या काटोल विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाने डूबलीकेट अनिल देशमुख उमेदवारी दिली असली तरी काटोल मतदारसंघ भाजपला यश यणार नाही त्यांनी भाजपचा उमेदवार चरण सिंग ठाकूर यांना दिली आहे तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे -इ फार्म देउन उमेदवारी दिली आहे. डुप्लिकेट अनिल देशमुख हा सर्वसामान्य नागरिक असून, डुप्लिकेट अनिल देशमुख यांनी उमेदवारी दाखल केल्यापासून ते आजतागायत घरी परतले नाहीत, पोलिसांनी त्यांच्या घरावर नाकाबंदी केली आहे. त्याच्या घरी येणाऱ्या जाणाऱ्या ची विचारना केली जात आहे. काही दिवसांपासून तो पत्नी आणि मुलांना भेटला नाही, त्यामुळे त्याची पत्नीही चिंतेत आहे. राष्ट्रवादीचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी काटोल विधानसभेतून त्यांच्या जागी त्यांचा मुलगा सलील देशमुख यांना उमेदवारी दिली आहे, आज अनिल देशमुख यांनी डुप्लिकेट अनिल देशमुख यांच्या घरासमोर जाऊन पत्रकारांशी संवाद साधला आणि माहिती देताना त्यांनी ही सारी युक्ती महायुतीने केल्याचे सांगितले. गेल्या काही दिवसांपासून भाजपच्या लोकांनी अनिल देशमुखचा डुप्लिकेट गायब केला असून डुप्लिकेट अनिल देशमुखचा एबी फॉर्मही खास विमानाने पाठवण्यात आल्याचे देशमुख म्हणाले.

### निवडणूक निरीक्षक नरिंदर सिंग बाली यांच्याकडून निवडणूक तयारीचा आढावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**वर्सोवा विधानसभा मतदारसंघ-१६४ च्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात निवडणूक निरीक्षक नरिंदर सिंग बाली यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या निवडणूक तयारीबाबत आढावा घेतला. या बैठकीत निवडणूक निर्णय अधिकारी सुभाष काकडे, चंद्रकांत काटकर आणि सहायक पोलिस अधीक्षक यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक निरीक्षक श्री. बाली यांनी मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या. त्यांनी विविध निवडणूक केंद्रांवर भेट देऊन बूथ लेवल ऑफिसरना मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्याबाबत मार्गदर्शन केले. निवडणूक निरीक्षक बाली यांनी आनंदनगर येथील नागरिकांना मतदान करण्याबाबत आवाहन केले. लोखंडवाला उद्यानात विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकांना आणि नातेवाइकांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याबाबत मार्गदर्शन केले.

## एका जातीवर राजकारण होत नाही, ही वस्तुस्थिती आहे

### बच्चू कडू यांचे मनोज जरंगे यांच्या निर्णय यावर स्पष्टीकरण

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी :** मराठा नेते मनोज जरंगे यांची निवडणुकीतून माघार घेत जे बोलले आहेत, की एका जातीवर राजकारण होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. असे मत प्रहार चे बच्चू कडू यांनी व्यक्त केले ते नागपूर येथे दि.४ नोव्हेंबर रोजी प्रसार माध्यमांसमोर बोलत होते. यावेळी बच्चू कडू पुढे म्हणाले की, सर्व राजकीय पक्ष धर्म आणि जातीवर निवडणूक लढवत आहे. त्यासोबत पैशाची ताकद असते, हे समीकरण मोठ्या पक्षानी सुरू केले आहे. त्यामुळे जरांगे जे बोलले ते योग्यच आहे. मुळात केलेलं काम समोर ठेवून निवडणूक लढवली पाहिजे, मात्र सर्व राजकीय पक्षांनी राजकारणाची व्याख्या बदलून दिली आहे, बच्चू कडू चार वेळेला निवडून आला, इतर पक्षांची झुंडशाही मी माझ्या मतदारसंघातून संपवली, तेच महाराष्ट्रात करू असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. तर एका जातीचे आधारावर राजकारण होऊ शकत नाही, मी काही कोणाचा राजकीय गुरू नाही, त्यामुळे समजून सांगायची गरज नाही आणि जरांगे तसे हुशार आहेत.मातीवरच्या जमिनीवरच्या माणसाला समजावून सांगायची गरज पडत नाही. मोठ्या नेत्यांना समजावून सांगणारे पंधरा-वीस लोकं असतात मात्र बच्चू कडू आणि इतर जमिनीवरच्या कार्यकर्त्यांना समजावण्याची गरज पडत नाही, असे ते म्हणाले तर यावेळी मनोज जरांगे वर राजकीय दबाव होता का ? असा प्रश्र्न केला असता बच्चू कडू म्हणाले की मला वाटत नाही मनोज जरंगे पाटील हे दबावला बळी पडणारा माणूस आहे. तर जरांगेच्या माघारीमुळे कोणाचा फायदा होणार असा प्रश्र्न केला असता फायदा कोणाला होईल याचा कुठलाही मोजमाप यंत्र नाही, ग्राउंड वरची राजकीय परिस्थिती वेगळी असते, त्यामुळे ते सांगता येणार नसल्याचे मग त्यांनी व्यक्त केले. जरांगेचा परिवर्तन महाशक्तीला पाठिंबा का या संदर्भात छत्रपती संभाजी राजे निर्णय घेतील, कोणी ही पाठिंबा दिला तरी फायदा होतोच. कोणीही चेंडू टाकला तर आम्ही बॅटिंग मजबूत करतो, येणाऱ्या निवडणुकीत तुम्हाला माहित पडेल की बच्चू कडू ची बॅटिंग टाइमिंग आणि वार कसा असतो हे दाखवून देऊ असे म्हणून अपक्ष उमेदवाराबाबत मत व्यक्त करताना आधी एका गावात एकच डॉक्टर असायचा आता अनेक डॉक्टर झालेत. त्यामुळे रुग्णांची सेवा होत आहे. असा संदर्भ देत अपक्ष उमेदवाराबबत आपले मत व्यक्त केले.

## बुलढाण्यातील बंडखोरीचा वाद मिटविण्यात अखेर महायुतीच्या नेत्यांना यश

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/प्रतिनिधी :** महायुतीचे बंडखोर उमेदवार भाजपाचे नेते विजयराज शिंदे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची घोषणा केली आहे. काल भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी झालेल्या चर्चे नंतर विजयराज शिंदे यांनी माघार घेतलीय. बुलढाण्यात शिंदे गटाचे उमेदवार संजय गायकवाड यांच्या विरुद्ध विजयराज शिंदे यांनी उमेदवारी दाखल केली होती. विजयराज शिंदे यांनी भाजपाकडे मैत्रीपूर्ण लढतीची परवानगी देखील मागितली होती. काल प्रदेशाध्यक्ष बावनकुळे व विजयराज शिंदे यांच्या चर्चेनंतर बुलढाण्यात बंडखोरी मोडीत काढण्यात महायुतीला यश आल्याचे दिसून येत आहे.

## काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत बंडखोरांच्या मन धरणीला यश, महाआघाडीच्या १८० जागा आल्यास आश्चर्य नको- बाळासाहेब थोरात



दैनिक आपला विदर्भ

**नंदूरबार/प्रतिनिधी :** काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात आज नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तळोदा मतदार संघात काँग्रेसचे जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुहास नाईक यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या बंडखोरीला रोखण्यासाठी पक्ष श्रेष्ठींकडून प्रयत्न करण्यात येत होते. आज काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब ठाकरे सोबत बैठक घेत सुहास नाईक यांच्या घरी जात त्यांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर लगेचच सुहास नाईक यांनी आपला उमेदवारी अर्ज माघार घेण्याची घोषणा केली. त्यामुळे काँग्रेसचे उमेदवार राजेंद्र गावित यांना मोठा फायदा होणार आहे. यावेळी पुढे बोलताना बाळासाहेब थोरात यांनी सांगितले की राज्यात महाआघाडीच्या १८० जागा आल्यास आश्र्चर्य मानू नये आम्हाला पहिले महायुतीचे सरकार घालवणे महत्त्वाचे आहे .कारण त्यांचे सरकार संविधानाविरुद्ध असून पक्षांतर बंदीच्या कायद्या मोडीत काढला आहे. त्यामुळे महायुतीचे सरकार जाणे व महाआघाडीचे सरकार येणे हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. मनोज जरांगे पाटील यांनी जो निर्णय घेतला आहे तो अतिशय योग्य असून अत्यंत विचारांती घेतलेला निर्णय आहे या निर्णयाच्या महाविकास आघाडीला मोठ्या प्रमाणात फायदा होईल. त्याचबरोबर रश्मी शुक्ला यांच्या बदली संदर्भात बाळासाहेब थोरात यांनी सांगितले की निवडणूक निर्णय अधिकार्यांचा अतिशय योग्य निर्णय आहे. देशात व राज्यात विविध संस्थेच्या दुरुपयोग होत होता त्यामुळे हा निर्णय अतिशय योग्य असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

## जिल्ह्यात सात विधानसभा मतदारसंघात ७२ उमेदवारांची माघार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणूकीत जिल्ह्यातील सातही मतदारसंघात नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याच्या आजच्या अंतिम दिवशी ७२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता ११५ उमेदवारांमध्ये लढत होणार आहे.

मलकापूर मतदारसंघात ७, बुलढाणा येथे ८, चिखली येथे १८, सिंदखेड राजा येथे १८, मेहकर येथे ११, खामगांव येथे ४ व जळगांव जामोद येथे ६ असे एकूण ७२ उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज मागे घेतले.

मलकापूर येथे १५, बुलढाणा येथे १३, चिखली येथे २४, सिंदखेड राजा येथे १७, मेहकर येथे १९, खामगांव येथे १८ व जळगांव जामोद येथे ९ असे एकूण ११५उमेदवारांमध्ये लढत होईल.

अर्ज मागे घेतलेले उमेदवार

मलकापूर मतदारसंघ - संदिप देविदास फाटे, मोहम्मद दानीश अब्दुल रशीद,विरसिंह ईश्र्वरसिंह राजपुत,सुनिल वसंतराव विंचनकर,सचिन दिलीप देशमुख,सौरभ चंद्रवदन इंगळे, हरीश महादेवसिंह रावळ ( सर्व अपक्ष).

बुलढाणा मतदारसंघ - प्रमोद पुंजाजी कळसकर,स्वाती विष्णू कंकाळ, प्रा. सदानंद मन्साराम माळी, जितेंद्र एन.जैन, प्रा. रतन आत्माराम कदम,विजयराज हरिभाऊ शिंदे,डॉ. मोबीन खान अय्युब खान,आरिफ खान विवन खान ( सर्व अपक्ष).

चिखली मतदारसंघ - नरहरी ओंकार गवई,नाजेमा नाज इम्रान पठाण,अब्दुल रियाज अब्दुल समद सौदागर, वृषाली राहुल बोंद्रे, रविंद्र नारायण डाळीमकर, मृत्युंजय संजय गायकवाड, मनोज सारंगधर लाहुडकर , सतीश मोतीराम गवई,बबन डिगांबर राऊत, विनायक रामभाऊ सरनाईक , शरद रमेश खपके,सिध्दार्थ अंकुश पैठणे,देवानंद पांडुरंग गवई,मिलींदकुमार सुधाकर मघाडे, नितिन रंगनाथ इंगळे-राजपूत,संजय धोंडु धुरंधर,अब्दुल वाहीद शे. इस्माईल, राजेंद्र सुरेश पडघान ( सर्व अपक्ष).

सिंदखेड राजा मतदारसंघ - डॉ. मनोरखा रशीदखा पठाण,शेख रफिक शेख शफी,अभय जगाराव चव्हाण,विजय प्रतापराव घोंगे, मनसब खान सादतमीर खान पठाण, राजेंद्र मधुकर शिंगणे, शिवाजी बाबुराव



मुंढे,अशोक श्रीराम पडघान, ज्ञानेश्र्वर कैलास म्हस्के,नामदेव दगडू राठोड,सुनील तोताराम कायंदे, सुरज धर्मराव हनुमंते ,अंकुर त्र्यंबक देशपांडे, अलका रामप्रसाद जायभाये, भाई दिलीप ब्रम्हाजी खरात, प्रल्हाद रंगनाथ सोरमारे.(सर्व अपक्ष) शिवानंद नारायण भानुसे(संभाजी ब्रिगेड पार्टी),प्रकाश शिवाजी गीते(बहूजन समाज पार्टी)

मेहकर मतदारसंघ- नरहरी ओंकार गवई, डॉ. सांची सिध्दार्थ खरात, प्रकाश गणपत अंभोरे, लक्ष्मण जानुजी घुमरे, मुरलीधर दगडू गवई,वामनराव सुर्यभान वानखेडे, डॉ. गोपालसिंह बछीरे, प्रकाश चिंधाजी गवई, डॉ. जानु जगदेव मानकर,कैलास कुरू खंदारे (सर्व अपक्ष),रजनीकांत सुधीर कांबळे (राष्ट्रीय समाज पक्ष).

खामगांव मतदारसंघ -अँड. रवींद्र भोजने,अमोल अशोक अंधारे, किरण रामचंद्र मोरे(सर्व अपक्ष)शिवशंकर पुरुषोत्तम लगर(महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

जळगाव जामोद मतदारसंघ - अमित रमेशराव देशमुख (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), अरुण भिकाजी निंबोळकर, पवन भाऊराव गवई,देवानंद शंकर आमझरे,मंगेश विश्र्वनाथ मानकर,डॉ. संदिप रामदास वाकेकर ( सर्व अपक्ष). यानुसार,सात विधानसभा मतदारसंघात एकूण ११५ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.